भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2021 ◐ BK 56218

अनु.क्र. ८०६९३ दि. २२।२।२०२२ मु.शु.रक्कम ५००

दस्ताचा प्रकार हमीपत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन —

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव गीता विठ्ठल ...

पत्ता (हिंजवडी) मावळ पुणे

दुसऱ्या पक्षकाराचे नांव PMRDA

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता सचिन ..., धनकवडी पुणे

शुभांगी सुहास वनकर
परवाना क्र. २२०११९७

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही १३४४ शिवाजीनगर, पुणे म.न.पा. समोर, पुणे-५

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे

21 FEB 2022

प्रथम मुद्रांक लिपीक कोषागार पुणे कार्यालय

## हमीपत्र

हमीपत्र आज दिनांक / /२०२२ इसवी ते दिवशी.

मी/ आम्ही, मे. गिता विघाई कन्स्ट्रक्शन्स तर्फे १) श्री. संतोष भवानीलाल यादव, वय- ३८ वर्षे, धंदा- व्यवसाय, २) श्री. रोमित अशोक अगरवाल, वय- ३६ वर्षे, धंदा- व्यवसाय, राहणार - हिंगणे होम कॉलनी, कर्वेनगर, ता. हवेली, जि. पुणे. हमीपत्र लिहून देतो की,

मौजे भुकूम, ता. मुळशी, जि. पुणे येथील ग. नं. ४३ (पैकी), पुणे यांसी एकूण क्षेत्र ५५२१.०० चौ.मी. या मिळकतीमध्ये निवासी/ बिगर निवासी पद्धतीचा प्लॉटचे बांधकामाबाबत प्रस्ताव जागामालक / कुलमुखत्यारपत्रधारक म्हणून मी/आम्ही दाखल केला आहे. तूर्त या जागी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत कडून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही. याची माहिती मला/आम्हाला देण्यात आली असून याला पर्याय म्हणून जागेवरील बोअरद्वारा पाणी उपलब्ध करून देण्याची किंवा टँकरद्वारा पाणी मिळण्याची व्यवस्था करित आहोत. व त्यासंबंधी आवश्यक त्या वरीष्ठ भूवैज्ञानिक अधिकारी, भुजल सर्व्हेक्षण आणि विकास योजना (G.W.S & D.A.) या कार्यालयामार्फत किंवा तत्सम तांत्रिक सल्लागारामार्फत सदर जागी पाणी असल्याबद्दलचे प्रमाणपत्र आणून देणेची कार्यवाही करणे आमचेवर बंधनकारकराहील.

२) इमारत पूर्ण झाल्यावर इमारतीमधील निवासी / बिगर निवासी वापरासाठी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत पिण्यासाठी पुरेसा पाणी पुरवठा पुरेशा दाबाने करु शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या नात्याने इमारतींमधील रहिवाशांच्या खर्चाने करून देण्यास तयार असून त्याची सर्व जबाबदारी मी/आम्ही या हमीपत्राद्वारे स्विकारत आहे.

३) पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत मार्फत कोणताही पाणीपुरवठा सुरु न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास मी / आम्ही कोणत्याही कोर्टाकडे या बाबतीत दावा दाखल करणार नाही.

४) निवासी अगर व्यापारी गाळ्याचे विक्रीचे बुकींग करतांना येणाऱ्या करारनाम्यामध्ये पाण्
पुरवठ्याची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थिती विशेष बाब म्हणून नमूद करुन घेण्याची जबाबदारी राहील
जागेवरील परिस्थितीची जाणीव नियोजीत गाळेधारकांना करून दिल्यानंतरसुद्धा या ठिकाणी होणा
बुकींगनंतर होणाऱ्या नियोजीत गाळेधारकांना पाणी पुरवठा अपुरा झाला तर पुणे महानगर प्र
क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत चा पुरेसा पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत
धारकाच्या खर्चाने पुरेसा पाणी पुरवठा करुन देण्याची माझी/आमची जबाबदारी राहील
महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत ला तोशीष लागू

नाही.

६) सदरची योजना संपूर्णरित्या प्रवर्तक/मालक या नात्याने मी/आम्ही अन्य कोणास भविष्य काळात विकल्यास नवीन मालक / प्रवर्तकास या हमीपत्रातील सर्व बाबींची लेखी कल्पना देईन त्याचा समावेश नवीन करारनाम्यात करण्यांत येईल याची काळजी घेईन/घेऊ

७) हे हमीपत्र माझे/आमचे वालीवारसांवर बंधनकारक राहील.

८) सदर प्लॉटमधील संदर्भातील कोणत्याही होणाऱ्या करारामध्ये या हमीपत्राचा समावेश करण्यात येईल व हे हमीपत्र करारनाम्यातील विशेष बाब म्हणून समजण्यात येईल.

वरील हमीपत्र मी / आम्ही राजीखुषीने दि. / /२०२२ रोजी लिहून दिले आहे.

पुणे

दिनांक : / /२०२२

हमीपत्र लिहून देणार

मे. गिता विद्याई कन्स्ट्रक्शन्स तर्फे



१) श्री. संतोष भवानीलाल यादव



२) श्री. रोमित अशोक अगरवाल